# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


====================================================================

जावक क्रमांक – ५७७/१९ दिनांक :- १२ फेब्रुवारी, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# 'म्हाडा' मुख्यालयाची गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केली पाहणी

डॉ. भोयर यांनी 'म्हाडा'मध्ये राबविलेल्या विशेष स्वच्छता व अभिलेख वर्गीकरण मोहिमेचे केले कौतुक

मुंबई, दि. १२ फेब्रुवारी, २०२५ :- महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील गृहनिर्माण भवन या म्हाडा मुख्यालयास आज भेट दिली. या भेटीदरम्यान 'म्हाडा'मध्ये १०० दिवसांच्या कृती आराखडा अंतर्गत नुकत्याच राबविण्यात आलेल्या विशेष स्वच्छता व अभिलेख वर्गीकरण मोहिमेबाबत माहिती जाणून घेत म्हाडा मुख्यालयातील विविध कार्यालयांची प्रत्यक्ष पाहणीही डॉ. भोयर यांनी केली.

म्हाडातर्फे १०० दिवसांचा कृती आराखडा अंमलबजावणीबाबत केल्या जाणाऱ्या प्रभावी उपाययोजनांचे राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी कौतुक केले. नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत व म्हाडामध्ये कर्मचाऱ्यांनी कार्यालयात अशाच प्रकारची स्वच्छता भविष्यातही ठेवावी व वेळोवेळी अभिलेख वर्गीकरण करीतच रहावे, असे निर्देश डॉ. भोयर यांनी दिले.

यावेळी 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.), म्हाडाच्या सचिव श्रीमती नीलिमा धायगुडे आदी उपस्थित होते. म्हाडाच्या मुख्यालयात नागरी सुविधा केंद्र (Citizen Facilitation centre) उभारण्याचे काम सुरू असून या केंद्राच्या उभारणीच्या कामाचा तसेच विझीटर मॅनेजमेंट सिस्टमचा आढावाही डॉ. भोयर यांनी घेतला.

श्री. जयस्वाल यांनी सांगितले की, 'म्हाडा'च्या मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व विभागीय मंडळांच्या कार्यालयांमध्ये शासनाच्या कृती आराखड्याची तत्परतेने अंमलबजावणी करण्यात येत आहे. म्हाडातील दोन दिवसीय स्वच्छता व अभिलेख वर्गीकरण मोहीम या त्याचाच भाग असल्याचे श्री. जयस्वाल म्हणाले. म्हाडाचे संकेतस्थळ सर्व माहितीने परिपूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले असून कागदविरहित प्रशासनावर भर देणारी ई–ऑफिस प्रणाली म्हाडामध्ये सुरू करण्यात आल्याचे श्री. जयस्वाल यांनी सांगितले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

--------------------------------------------------------------------

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

===========================================================================

Outward No. : 577/19 Dt. February 12, 2025

Press Release

# Minister of State for Housing, Dr. Pankaj Bhoyar visited MHADA Headquarters

Dr. Bhoyar Appreciates the Special Cleanliness and Record Classification Drive Conducted at MHADA

Mumbai, February 12, 2025: Maharashtra's Minister of State for Housing, Dr. Pankaj Bhoyar, visited the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) headquarters at the Gruha Nirman Bhavan in Bandra East today. During this visit, Dr. Bhoyar reviewed the recently conducted special cleanliness and record classification drive, which was carried out as part of MHADA's 100-day action plan. He also personally inspected various offices within the headquarters.

Dr. Bhoyar praised the effective measures undertaken for implementing the 100-day action plan. He emphasized the need for continuous efforts to improve citizens' daily lives and instructed MHADA employees to maintain similar levels of cleanliness in the offices in the future. He also stressed the importance of regularly classifying records.

Present at the occasion were MHADA's Vice President and Chief Executive Officer, Mr. Sanjeev Jaiswal (IAS), and Secretary, Mrs. Neelima Dhaigude, among others. Dr. Bhoyar also reviewed the ongoing development of the Citizen Facilitation Centre at the MHADA headquarters, as well as the implementation of the Visitor Management System.

Mr. Jaiswal stated that the government's action plan is being promptly implemented across all regional offices of MHADA in Mumbai and throughout Maharashtra. The two-day cleanliness and record classification drive at MHADA was a part of this initiative. He also informed that MHADA's website is being enriched with comprehensive information, and an e-office system has been introduced to promote paperless administration.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial







